# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


त्वरीत

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/शिक्षण शुल्क/२०१२/1659

दिनांक : 19 JUN 2012

प्रति,

प्राचार्य/संचालक

____________________

____________________

____________________

____________________

____________________

(सर्व पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा–या सर्व संस्था)

विषय :– शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारणी करणा–या संस्थांवर कारवाई करणेबाबत...

संदर्भ :– १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम २००४/(५४५/०४)/ तंशिं–१, दि. ११.०१.२००५.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/ एडीएम/२०१२/११४५, दि. १२ जून २०१२.

शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मधील संचालनालयाच्या वतीने राबविण्यांत येणा–या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहे. त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा–या संस्थांचे जे शिक्षण शुल्क राज्याच्या शिक्षण शुल्क समितीने जाहीर केलेले आहे त्या निर्धारित केलेल्या शुल्क तसेच विद्यापीठाने ठरविलेले परीक्षा व एनरॉलमेंट फी या व्यतिरिक्त संस्थांनी कुठलेही शुल्क आकारू नये असे संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये शासनाने कळविलेले आहे. तसेच एखादी संस्था विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारत असेल व त्यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यास सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यांत येईल व त्यासंबंधी महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट १९८७ नुसार संबंधित संस्थांची तपासणी करण्याची व त्यात संस्था दोषी आढळल्यास त्यावर कारवाई करण्याच्या तरतूदी संदर्भाधीन शासन निर्णयात स्पष्ट करण्यांत आलेल्या आहेत. (सोबत शासन निर्णयाची प्रत जोडली आहे)

सदर शासन निर्णयातील तरतूदींचा विचार करून आपल्या संस्थेत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विहीत शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्यांत येऊ नये. विहीत शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारण्याची तक्रार प्राप्त झाल्यास शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदरचे जास्तीचे शुल्क हे कॅपिटेशन फी म्हणून समजण्यांत येईल व आपल्या संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे दाखल करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत : प्रोग्रामर हेच कार्यालय हयांना आवश्यक कार्यवाहीसाठी. सदरहू पत्र या कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावे.

Instt. Letter